N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** यवतमाळ **P.S.(ठाणे):** दारवा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0515 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/07/2025 02:04

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 22/07/2025

**Date To ( दिनांक पर्यंत):** 24/07/2025

**Time From (वेळेपासून):** 16:04 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:58 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 25/07/2025 **Time (वेळ):** 01:03 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/07/2025 01:03 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मौजा बागवाडी गावचे बसस्टॉप जव,दारव्हा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** देवानंद सुरेश काळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1994

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गोंडेगाव, ता दारव्हा,दारव्हा,दारवा ,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गोंडेगाव, ता दारव्हा,दारव्हा,दारवा ,यवतमाळ,महाराष्ट्र भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9356243822

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहित असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. जितेंद्र पांडुरंग ठाकरे | | | 1. महागाव कसबा, ,ता दारव्हा, दारवा ,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | जय गणेश सोनोने | | | 1. पांढरकवडा,दारव्हा,दारवा यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 3 | पवन तानसेन भितकर | | | 1. अंबिकानगर दारव्हा,दारव्हा, दारवा ,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 4 | निलेश भास्कर तलवारे | | | 1. हातणी,दारव्हा,दारवा ,यवतमाळ, महाराष्ट्र,भारत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | अशोक श्रावन रमखाम | | | 1. हरु, ता दारव्हा,दारव्हा,दारवा , यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

माझे नांव:- श्री. देवानंद सुरेश काळे, वय 31, धंदा होमगार्ड, रा. पो. गोंडेगाव, ता. दारव्हा, जि.यवतमाळ मी रहिवासी असुन तेथे कुटुंबासह राहतो. मी शेती करतो व यवतमाळ येथे होमगार्ड म्हणुन सन 2013 पासुन कार्यरत आहे. तसेच माझे पत्नीचे नावे महींद्रा कंपनीचा एम.एच. 29 सी.बी. 6514 क्रमांकाचा ट्रॅक्टर असुन त्यावर चालक म्हणुन करन रामु जिरे रा.गोंडेगाव याला ठेवुन त्याव्दारे मुरमाची परवाना धारक खदान मालकाकडुन खरेदी करतो व विक्री करतो. माझे शिक्षण बी.ए. 2 वर्ष येवढे झालेले असुन मला मराठी, हिंदी भाषा समजते लिहीता व वाचता येते. दिनांक 21/07/25 रोजी मला बाबुसिंग राठोड यांना 1 ब्रास मुरूम देण्याची ऑर्डर मिळाली होती. त्यानंतर मी ट्रॅक्टर चालक करन रामु जिरे याचेकडे 700/- रूपये देवुन खदान मालक शिरीश रेणुराव पाटील यांचे बागवाडी येथील खदानीवर पाठविले होते. त्यानंतर त्याने खदान मालकाकडुन कायदेशीर रॉयल्टीची पावती घेवुन ट्रॅक्टरमध्ये 1 ब्रास मुरूम भरून तो बागवाडी ते धनगरवाडी असा प्रवास करीत असतांना साजेगाव ते दहेली रोडवर पिंप्री फाटयाजवळ पंचर झाल्याने थांबला होता. त्यानंतर दुपारी 04 ते 04.30 वा. चे दरम्यान मला चालक करन जिरे याचा फोन आला की आपली गाडी पकडली आहे तुम्ही लगेच या. असे सांगितलेवरून मी लगेचच माझे ट्रॅक्टरजवळ गेलो असता तेथे चालक करन जिरे याचेसोबत हजर असलेले चार ईसमांनी ते महसुल विभागाचे अधिकारी असल्याचे सांगुन त्यांची नावे मंडळ अधिकारी ठाकरे, तलाठी.भटकर,तलवारे, सोनवणे असे सांगितले. तसेच त्यांचेसोबत आणखी एक ईसम हजर होता त्याचे नाव अशोक रमखाम आहे असे त्यांनी मला सांगितले. त्यांनी मला, तुझी मुरूम वाहतुक करण्याचा परवान्याची वेळ होवुन गेली आहे. त्यामुळे तुझा ट्रॅक्टर कारवाई करून तुला 1,20,000/- रूपयेचा दंड भरावा लागेल. तो तुला भरायचा नसेल आणि तुझा ट्रॅक्टर सोडायचा असेल तर आम्हाला आत्ताचे आता 40,000/- रूपये रोखीने द्यावे लागतील, असे बोलेले. त्यावेळी मी त्यांना माझा ट्रॅक्टर पंचर झाल्यामुळे उभा आहे कृपया आपण चुकीची कारवाई करू नका, अशी विनंती केली. परंतु त्यांनी माझेकडे 40,000/- रोखीने देणेकरीता तगादा लावला. त्यानंतर मी त्यांना माझेकडे एवढी रोख रक्कम नाही असे बोललो. त्यावेळी तलाठी सोनोने यांनी मला त्यांचेसोबत हजर असलेल्या खा. ईसम नामे रमखाम याचे फोनपे वर 40,000/- रूपये ऑनलाईन पाठवायला सांगितले. त्यावेळी मी त्यांना सांगितले की माझे खात्यामध्ये आता 12,000 रूपये आहेत व पत्नीकडुन 5000/-रु मागुन देवु शकतो. तेव्हा तलाठी सोनोने यांनी आता 17,000/- रूपये रमखाम यांचे फोनपे वर पाठवुन द्या बाकीचे 23,000/- रूपये तुला उद्या अषोक रमखाम ने फोन केल्यावर सांगेल तेथे घेवुन ये, असे बोलेले. त्यावेळी तेथे हजर असलेल्या रमखाम याने पैसे त्याचे मुलाचे खात्यावर पाठवा असे म्हणुन मला त्याचे फोनपे क्रमांक सांगितला. तो मी माझे फोनपेमध्ये टाकला असता त्यात अनंता अशोक रमखाम असे नाव दिसले. ते मी रमखाम यांना दाखविले. त्यांनी मला बरोबर आहे असे म्हणुन त्यावर त्या सर्वांच्या समक्ष पैसे पाठविण्यास सांगितले. मग मी पहील्यांदा 12,000/- रूपये व त्यानंतर माझे पत्नीकडुन 5,000/- घेवुन एकुण 17,000/- रूपये पाठविले. त्यानंतर उर्वरीत रक्कम 23,000/- रूपये मला दि. 22/07/25 रोजी घेवुन बोलाविले होते. मला

सोनोने व त्यांचे समवेत आलेल्या मंडळ अधिकारी ठाकरे, तलाठी भटकर, तलवारे यांना आणखी लाच रक्कम द्यावयाची नसल्याने मी त्यांचेविरुध्द कायदेशीर तक्रार देण्याकरीता दिनांक 22/07/25 रोजी लाचलचुपत प्रतिबंधक विभाग कार्यालय यवतमाळ येथे पोनि घनवट यांचे समक्ष हजर राहुन माझी लेखी तक्रार दिली होती. माझी त्या चारही अधिकारी व खा.ईसम यांचेशी कोणत्याही प्रकारचे दुष्मनी नसुन त्यांचेसोबत कोणत्याही प्रकारचा पैशाचा उधार उसणवारीचा व्यवहार आमचेत नाही. मी माझे तक्रारीसोबत पुढील कार्यवाही करण्याकरीता रॉयल्टीची पावती व खा. ईसम अशोक रमखाम याचे मुलगा नामे अंनता अशोक रमखाम यांचे फोनपेवर पाठविलेल्या 12,000/- रूपये व 5,000/- असे एकुण 17,000/- रूपयाची व्यवहाराचे छायांकित सत्यप्रत तक्रारीसोबत जोडुन सादर केली होती. माझे तक्रारीची पडताळणी दि. 22/07/25 रोजी ला.प्र.वि. यवतमाळ येथील पोनि अर्जुन घनवट, 2 शासकिय पंच व ला.प्र.वि. येथील पोलीस पथक यांनी दारव्हा येथे येवुन केली होती. मी दि 22/07/25 रोजी मला लोकसेवक सोनोने यांचे फोनवरून माझे वापरते फोन क्र. 9356243822 वर फोन आला होता. त्यावेळी मी त्यांना मला तुम्हाला भेटायला यायचे आहे, माझा दि 21/07/25 रोजी तुम्ही ट्रॅक्टर पकडला होता, त्याअनुषंगाने मला तुम्हाला भेटायचे आहे असे मी त्यांना बोललो असता त्यांनी मला सांगितले की, तु मला भेटायला येवु नको, तु रमखाम यांना भेटुन घे असे बोलले. रमखाम हे खा.ईसम असुन ते लोकसेवक सोनोने यांचेकरीता काम करतात. यावरून सोनोने हे माझेकडे खा. ईसमाच्या माध्यमातुन लाच मागणी करीत आहेत. ही बाब पडताळणी पथकासमोर निष्पन्न झाली होती. त्यानंतर मी खा. ईसम नामे रमखाम यांची तलाठी कार्यालय दारव्हा येथे पंचांसमक्ष जावुन भेट घेतली असता त्यांनी माझेकडे पैषांची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, माझे पत्नीची डिलीवरी झाली आहे, त्यामुळे प्राब्लेम आहे. मी तुम्हाला तुम्ही मागितलेल्या 23,000/- रू. पैकी अर्धे पैसे उदया आणुन देईल. त्यानंतर खा. ईसम रमखाम हे मला बोलले की, तु उदया पैसे आणुन दे, मी सर्व साहेबांना सांगतो हे महत्वाचे आहे वगैरे आमच्यात चर्चा झाली होती. अषाप्रकारे लोकसेवक सोनोने व खा. ईसम . रमखाम यांनी माझेकडे दि 22/07/25 रोजी माझ्या पकडलेल्या मुरूमाच्या ट्रॅक्टरवर कायदेषिर कारवाई न करण्याच्या बदल्यात लाच मागणी केली होती ही बाब पंचांसमक्ष केलेल्या पडताळणीत निष्पन्न झालेली होती. दि 22/07/25 रोजी करण्यात आलेल्या पडताळणीचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे. त्यानंतर दि.21/07/25 रोजी लोकसेवक ठाकरे, तलवारे व भितकर यांनी माझेकडे लाच मागणी केली असल्याने त्यांची पडताळणी दि. 23/07/25 रोजी करण्याचे माझे विनंतीवरून ठविण्यात आले होते. त्यानुसार दि 23/07/25 रोजी पंच व पोलीस पथक नमुद लोकसेवक हे माझेकडे लाच मागणी करीत आहेत काय? याची पडताळणी करणेकरीता दारव्हा येथे आले होते. त्यावेळी पडताळणी करणेकरीता मला पंचासह पाठविण्याचे ठरविले होते. मी लोकसेवक ठाकरे यांना भेटण्याकरीता जाण्यापुर्वी लोकसेवक . ठाकरे यांना माझे फोनवरून त्यांचे फोनवर फोन केला असता ते महागांव येथे कॅम्प करीता गेले असल्याचे त्यांनी मला सांगितले व ते मला बोलले की, तुझा मॅटर अजुन संपला नाही का? तु अशोकला भेटुन घे. मला आज तुला भेटता येणार नाही. तु उदया मला भेटायला ये. यावरून लोकसेवक ठाकरे हे माझा ट्रॅक्टर पकडण्यासाठी उपस्थित होते व त्यावेळी खा. ईसम अशोक हा तेथे उपस्थित होता व लोकसेवक ठाकरे हे प्रकरणाशी संबंधित असुन ते खा. ईसमास ओळखतात याची पंच व पडताळणी पथकाची खात्री झाल्याने पंच व पडताळणी पथकाने लोकसेवक ठाकरे यांना पुन्हा दि 24/07/25 रोजी भेटुन पडताळणी करण्याचे माझे विनंतीवरून ठरविले होते. त्यानंतर मी लोकसेवक भितकर यांना माझे मोबाईलवरून फोन करून नाव सांगितले असता त्यांनी माझे नाव ऐकुन फोन कट केला. त्यानंतर मी लोकसेवक तलवारे यांना माझे मोबाईलवरून फोन करून भेटायला यायचे आहे असे बोललो असता ते म्हणाले की, मला भेटायला येवु नका, मी ऑफीसमध्ये आहे व तुम्ही या प्रकरणाकरीता अशोकला भेटुन घ्या. यावरून लोकसेवक तलवारे हे प्रकरणाशी संबंधित असुन खा. ईसम अशोक यास ओळखतात याबाबत पंच व पडताळणी पथकाची खात्री झाली होती. यावरून दि 23/07/25 रोजी माझेत व लोकसेवक ठाकरे, भितकर व तलवारे यांचेत माझे फोनवरून झालेल्या संभाषणाबाबत सविस्तर पंचनामा पंचांचे उपस्थितीत करण्यात आला होता. त्यानंतर आज दि 24/07/25 रोजी लोकसेवक ठाकरे यांची भेट घेवुन खा. ईसम रमखाम यांस भेटुन पडताळणी व सापळा कारवाई करण्याचे माझे विनंतीवरून ठरविले होते. त्यानुसार आज दि24/07/25 रोजी पंच व पडताळणी पथक दारव्हा येथे आले होते. त्यानंतर पंच व मी लोकसेवक ठाकरे यांची भेट घेण्याकरीता तलाठी कार्यालय दारव्हा येथे गेलो होतो. तेथे मी ठाकरे यांची भेट घेतली. ठाकरे हे मला म्हणाले की, मी त्यांचेशी बोलतो. अशोकला भेटुन घे. त्यानंतर ते कार्यालयातुन निघुन गेले. त्यानंतर मी अशोकला फोन केला असता त्याने मला 3 वाजता भेटायला बोलविले. त्यानंतर मी पंचासह पुन्हा पोलीस पथकाकडे परत गेलो व सदरची हकीकत त्यांना सांगितली. त्यांनी रेकॉर्ड केलेले संभाषण ऐकले. त्यावरून लोकसेवक ठाकरे हे प्रकरणाशी संबंधित आहेत व ते खा. ईसम अशोक यास ओळखतात याची पंचांची व पडताळणी पथकाची पुन्हा खात्री झाली. मला दुपारी पुन्हा 3 वा. चे नंतर अशोक याचा मिसकॉल आला. त्यानंतर मी त्यास फोन केला त्यावेळी त्याने मला

पैसे घेवुन बागवाडी गावा जवळ बोलविले होते. त्याचा फोन आला त्यावेळी पंच व पडताळणी पथक यांनी तो ऐकल्याने लोकसेवक नामे ठाकरे, सोनोने, भितकर व तलवारे हे खा. ईसमाचे मार्फतीने माझेकडे मी यापुर्वी दिलेल्या 17,000 रूपयांच्या लाचे व्यतिरीक्त आणखी लाचेची मागणी करीत असुन मी खा. ईसम रमखाम यांना मागणी करीत असलेल्या उर्वरीत 23,000 रू. पैकी 7,500रू. घेवुन खा. ईसम रमखाम यांची भेट घ्यावी याकरीता पंच व पडताळणी पथकाकडुन बागवाडी गावा जवळ सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे माझे विनंतीवरून ठरविण्यात आले. त्यानुसार पंच व पथकाने मला मी उपलब्ध करून दिलेल्या 7,500रू. चे सविस्तर तपास टिपण तयार करून त्यास अॅन्थ्रॉसिन पावडर लावुन मला पंचासह बागवाडी येथे पाठविले होते व पंच क्र. 2 व पथक परिसरात आपले अस्तित्व लपवुन थांबले होते. त्यानंतर आयोजित केलेल्या सापळा कारवाही करीता दुपारी 15.20 ते 15.58 वा. दरम्यान खा.ईसम रमखाम याने मौजा बागवाडी गावचे बसस्टॉप जवळील वाघाई मंदीर जवळ माझेकडुन 7,500/- रू. लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. त्यानंतर मी सापळा पथकास नियोजित डावा हात केसावर फिरवुन ईशारा केला. त्यानंतर पथकाने तेथे येवुन खा. ईसम रमखाम यास जागेवर पकडुन त्याचे हातातील लाचेची रक्कम पंच क्र. 2 यांचे ताब्यात देवुन त्या नोटांचे क्रमांक तपासले ते सापळयापुर्वी तयार करण्यात आलेल्या टिपणाप्रमाणे बरोबर असल्याची खात्री झाल्यानंतर आम्ही सर्वजन खा. ईसम रमखाम याचे सह तलाठी कार्यालय येथे आलो. तेथे लोकसेवक ठाकरे, सोनोने, . भितकर व तलवारे हे हजर होते. त्यांना पोनिघनवट यांनी स्वतःची ओळख सांगुन कारवाईबाबत माहिती दिली व त्या सर्वांना घेवुन पंच व पोलीस पथक पुढील कारवाई करीता शा. विश्रामगृह दारव्हा येथे रवाना झाले होते. तरी लोकसेवक नामे (1) श्री. जितेंद्र पांडुरंग ठाकरे, वय 57 वर्ष, पद मंडळ अधिकारी, महागाव कसबा, ,लोकसेवक 2) अजय गणेश सोनोने, वय 26 वर्ष, पद ग्राम महसुल अधिकारी, साजा हरु क्र.30, लोकसेवक 3)पवन तानसेन भितकर, वय 30 वर्ष, लोकसेवक 4) निलेश भास्कर तलवारे, वय 30 वर्ष, 5) श्री. अशोक श्रावन रमखाम, वय 59 वर्ष, खा. ईसम धंदा रोज मजुरी, रा. यांनी दि 21/07/25 रोजी माझेकडे मुरूम वाहतुक करण्यासाठी रॉयल्टी भरल्याची शासकिय पावती असतानाही माझा मुरूम वाहतुक करणारा ट्रॅक्टर साजेगाव ते दहेली रोडवर पिंप्री फाटयाजवळ पंचर झाल्याने थांबला असतांना येवुन मला कायदेषिर कारवाईची भिती दाखवुन व धमकी देवुन माझेकडुन खा. ईसम नामे रमखाम याचे मुलाचे बॅंक खात्यावर 12,000 रू. व 5,000 रू. असे एकुण 17,000रू. त्यांच्या बेकायदेशिर आर्थिक लाभाकरीता पाठविण्यास भाग पाडुन आणखी 23,000रू. संगणमताने खा. ईसम रमखाम याच्याकडे देण्याकरीता दबाव आणुन याकरीता दि 23 व 24/07/25 रोजी माझेशी प्रत्यक्ष भेटुन व फोनवर बोलुन आज दि 24/07/25 रोजी 7,500रू. खा. ईसम श्री. रमखाम याचे मार्फतीने बागवाडी गावचे बसस्टॉप जवळील वाघाई मंदीर जवळ स्विकारले त्यावेळी त्यास रंगेहात पकडण्यात आले आहे. यावरून माझी त्या सर्वाविरूध्द कायदेशिर तक्रार आहे.माझी वरील प्रमाणे फिर्याद माझे सांगने प्रमाणे वाचुन पाहिली बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SHIVPRAKASH PRABHAKAR MULE(I (Inspector)) / POBN84107 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in-charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SHIVPRAKASH PRAB
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN84107